पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १८३**

(सभावृत्तांत)

**दिनांक – ०५/०८/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **मा.स्थायी** समितीची**साप्ताहिक** सभा बुधवार दिनांक **०५/०८/२०२०** रोजी **दु.०२.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य व अधिकारी उपस्थित होते तसेच सदर सभेत काही सन्मा.सदस्य आणि संबंधित अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चौंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे राहुल तानाजी
७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८. मा.कदम शशिकांत गणपत
९. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
१०. मा.संतोष बबन कांबळे
११. मा.अभिषेक गोविंद बारणे
१२. मा.फुगे भिमाबाई पोपट
१३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१४. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त(१), मा.पवार – अति.आयुक्त(२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.सुभाष इंगळे – उप आयुक्त, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, हे अधिकारी सभागृहात उपस्थित राहून तसेच मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी , मा.पाटील – शहर अभियंता, मा.तांबे - सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.दुरगुडे, मा.लोणकर, - सहाय्यक आयुक्त, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी हे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.पंकज भालेकर

मा.स्थायी समिती दिनांक – ०५/०८/२०२० रोजीची पाक्षीक सभा (कार्यपत्रिका क्रमांक १८३) बुधवार दिनांक - १२/०८/२०२० रोजी दु.२.१५ वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती -** बुधवार दि.०५/०८/२०२० ची मा.स्थायी समितीची सभाबुधवार दि.१२/०८/२०२० रोजी दु.०२.१५ वा. पर्यंत तहकुब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १८३**

(सभावृत्तांत)

(दि.०५/०८/२०२० रोजी दु.२.३० वा ची तहकूब सभा)

**दिनांक – १२/०८/२०२०** **वेळ – दु. ०२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **मा.स्थायी** समितीची दिनांक ०५/०८/२०२० (दुपारी२.३०वा.) ची तहकूब सभा बुधवार दिनांक **१२/०८/२०२०** रोजी **दु.०२.१५ वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य व अधिकारी उपस्थित होते तसेच सदर सभेत काही सन्मा. सदस्य आणि संबंधित अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे मयूर पांडूरंग
७. मा.कलाटे राहूल तानाजी
८. मा.कदम शशिकांत गणपत
९. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
१०. मा.संतोष बबन कांबळे
११. मा.अभिषेक गोविंद बारणे
१२. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१३. मा.फुगे भिमाबाई पोपट
१४. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१५. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त(१), मा.पाटील – अति.आयुक्त (१), मा.पवार – अति.आयुक्त (२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.भालकर – सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.इंदलकर – सहाय्यक आयुक्त, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH,

मा.घोडे, मा.गट्टूवार, मा.पवार – कार्यकारी अभियंता, मा.दांगट – प्रशासन अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी पीएमपीएमएल हे अधिकारी सभागृहात उपस्थित राहून तसेच मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.तांबे - सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.दुरगुडे, मा.लोणकर, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.चव्हाण, मा.जुंधारे, मा.देशमुख, मा.धुमाळ, मा.शिंदे, मा.टकले – कार्यकारी अभियंता हे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

----------

ठराव क्रमांक – ७२९९ विषय क्रमांक – १
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.अति. आयुक्त(२) यांचेकडील पत्र क्र.मभां/४/कावि/६०४/२०२०, दि.०६/०७/२०२०
मा.अति. आयुक्त(२)यांनी शिफारस केले प्रमाणे–

मनपाआरोग्यविभागाचे मागणीनुसार आवश्यक पायरेथ्रम एक्स 2 टक्के आय एस आय मार्क खरेदी करणेकामी ई.नि.सु.क्र.09/2020-21 अन्वयेप्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. प्राप्त निविदेमधीललघुत्तम पुरवठाधारक मे.रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन यांचे प्रती लिटर दरर.रु.2300/- नुसार 1325 लिटरसाठी एकुण र.रु.30,47,500/- (अक्षरी र.रू.तीस लाख सत्तेचाळीस हजार पाचशे फक्त) प्राप्त झालेअसुन प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय दर र.रु.30,47,500/- समान आहेत. सदरचे दरस्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन त्यांचेबरोबर करारनामा करुन पुरवठा आदेशनिर्गत करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३०० विषय क्रमांक – २
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – मध्य.साहित्य भांडार, वैद्य
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मसाभां/५/कावि/३६५/२०२०, दि.०९/०७/२०२०
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे–

मनपामार्फत सुरु करण्यात आलेल्या Covid Care Centre वॉर्डात हाऊसकिंपीगचेकाम करण्यासाठी ६ महिने कालावधी करीता करारनामा करुन काम करणेकामीExpression of Interestकरीता M/s.Disha Agencyयांनी फेर सादर केलेला दरWith PPE Kitव आवश्यक लागणारे मटेरिअल, जंतुनाशके सहीत र.रु.२४,०७७/- (कमी करुन दिलेनुसार) इतका दर सादर केलेला आहे. प्राप्त झालेल्यादरानुसार मनपामार्फत म्हाळुंगे इंगळे येथे सुरु करण्यात आलेल्या Covid Care Centre वॉर्डात १ महिना कालावधी करीता हाऊस किंपीगचे काम करणेकामी कमी करुनदिलेल्या दरानुसार सर्व खर्चासहित प्रति कर्मचारी र.रु.२४,०७७/- प्रमाणे४५ कर्मचा-यांकरीता येणा-या प्रति महा

र.रु.१०,८३,४६५/- (अक्षरी र.रू.दहा लाख त्र्याऐंशी हजार चाशे पासष्ठ फक्त) चे खर्चास व १महिन्यात केलेले कामकाज अहवाल समाधानकारक आल्यास पुढील कालावधीकरीता कमीकरुन दिलेल्या दरानुसार मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३०१ विषय क्रमांक – ३

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – YCMH स्टेशनरी कोठार

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वायसीएमएच/३/कावि/१९५/२०२०, दि.१६/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे–

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय पदव्युत्तर संस्थेस नॉन क्लोरोनेटेडबॅगांबाबत मासीक व वार्षीक मागणीनुसार खरेदी करणेत आलेली आहे. सदयस्थितीतयशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय पदव्युत्तर संस्थेत बॅगांचा तुटवडानिमार्ण झालेला आहे. नविन निविदा तयार करणेचे काम चालू आहे. तसेच मे.पास्कोएन्व्हायरलमेंटल सोलुशन प्रा.लि. यांचा मनपा सभेसमोर पुढील १५ वर्षाकरितामुदतवाढीचा प्रस्ताव प्रलंबित आहे. या सर्व बाबींचा विचारात घेता यशवंतरावचव्हाण स्मृती रुग्णालय पदव्युत्तर संस्थेचे कामकाज सुरळीत होण्याकरितापुढील १२ महिन्याकरिता तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे खर्च झाला आहे.

| अ.क्र. | बॅग साईज | दर र.रु. पॅकेट(१ पाकीट ५० बॅगा) | एकूण बॅग | पॅकेट | एकूण र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १४ इंच बाय १५ इंच लाल व पिवळया नॉन क्लोरानेटेड बॅग | १११.५० | ४००० नग | ८० पॅकेट | ८,९२०.०० |
| ०२ | १९ इंच बाय २१ इंच लाल व पिवळया नॉन क्लोरानेटेड बॅग | २४५.५० | ६००० नग | १२० पॅकेट | २९,४६०.०० |
| ०३ | २७ इंच बाय ३० इंच लाल व पिवळया नॉन क्लोरानेटेड बॅग | ८०३.०० | २०००० नग | ४०० पॅकेट | ३,२१,२००.०० |
| ०४ | बारकोड पांढरे/निळे | ०.९४ | १२०० नग | | १,१२८.०० |
| रक्कम रुपये | | | | | ३,६०,७०८.०० |
| जीएसटी १८ टक्के | | | | | ६४,९२७.०० |
| अक्षरी र.रु.चार लाख पंचवीस हजार सहाशे पस्तीस फक्त | | | एकूण र.रु. | | ४,२५,६३५.०० |

सबब, महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय पदव्युत्तरसंस्थेस आवश्यक असणाऱ्या नॉन क्लोरोनेटेड बॅग मे.पास्को एन्व्हायरलमेंटलसोलुशन प्रा.लि.यांचेकडुन मागील मंजूर दराने खरेदी करणेत आल्या व याकामीआलेल्या एकुण र.रु.४,२५,६३५/- (अक्षरी र.रू.चार लाख पंचवीस हजार सहाशे पस्तीस फक्त)चे खर्चास कार्योतर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३०२ विषय क्रमांक – ४

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – लेखा

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.लेखा/३/कावि/१२१/२०२०, दि.२४/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे–

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधीया लेखाशिर्षावर र.रु.२४४ कोटी (अक्षरी र.रु.दोनशे चव्वेचाळीस कोटी फक्त)तरतूद करणेत आली असून यामध्ये संचलनतूट १३३.५८ कोटी विविधप्रकारचे पासेसर.रु.१४.५९ कोटी बसेस खरेदी र.रु.३५.८३ कोटी व ई बस सबसिडी ६० कोटी असाअपेक्षीत खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे. सदर रकमेतून रक्कम रुपये ९ कोटीसंचलनतूट व सवलतीचे पासेसपोटी र.रु.१.२३ लाख असे र.रु.१०.२३ कोटी (अक्षरी र.रु.दहा कोटी तेवीस लाख फक्त) सन २०१९-२० च्या अंदाजित संचलन तूटीचेलेखापरिक्षण होऊन तूट कायम होईपर्यंत माहे जुलै २०२० चे अदा करावयाचेअसल्याने व सदरची बाब आर्थिक स्वरुपाची असल्याने मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३०३ विषय क्रमांक – ५

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – ग क्षेत्रिय, लेखा

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.पंकज भालेकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.गक्षेका/नि-३/कावि/१३७/२०२०, दि.२४/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे–

कोरोना विषाणू COVID-19चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिजामाता रूग्णालयातफिल्ड सर्व्हिलन्स टिम(FST)करीता डिझेल वाहन प्रदान करण्यात आले आहेत. सदरवाहनांचे डिझेल बिल ग क्षेत्रीय कार्यालयाचे प्रशासन विभागातील वाहन इंधनअधिकारी या लेखाशिर्षावरील तरतूद र.रू.1,50,000/- मध्ये "सार्वजनि वाचनालय ववृत्तपत्रे बिल"या लेखाशिर्ष वरील र.रू.3,00,000/- पैकी र.रू.2,50,000/- वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.२,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३०४ विषय क्रमांक – ६

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.अति. आयुक्त(२) यांचेकडील पत्र क्र.मभां/०४/कावि/६५१/२०२०, दि.२४/०७/२०२०

मा.अति. आयुक्त(२)यांनी शिफारस केले प्रमाणे–

मनपा आरोग्य विभागाचे मागणीनुसार आवश्यकजंतुनाशक/दुर्गधीनाशक युक्त औषध खरेदीकरणे कामी ई.नि.सु.क्र.08/2020-21 अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत

आले होते. प्राप्तनिविदेमधील लघुत्तम पुरवठाधारक मे.सुहरिद केमिकल्स, अंधेरी यांचे प्रती लिटरदर र.रु.1,380/- नुसार 4575 लिटरसाठी एकुण र.रु.63,13,500/- (अक्षरी र.रु.त्रेसष्ट लाख तेरा हजार पाचशे फक्त) प्राप्तझाले असुन प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय दर र.रु.62,44,875/- पेक्षा 1.09% अधिकआहेत. सदरचे दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन त्यांचेबरोबर करारनामाकरुन पुरवठा आदेश निर्गत करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३०५ | विषय क्रमांक – ७
दिनांक – १२/०८/२०२० | विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.भिमाबाई फुगे | अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.सहा. आयुक्त (भांडार) यांचेकडील पत्र क्र.मभां/१६/कावि/११०/२०२०, दि.२७/०७/२०२०

मा.सहा. आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे–

कोविड केअर सेंटरकरीता जैव वैद्यकीय घनकच-याची विल्हेवाट लावणेकामी नॉनक्लोरोनेटेड बॅग पिवळा रंगाची तातडीने आवश्यकता असल्याने मे.पॉस्कोएनव्हायरलमेंटल सोल्युशन प्रा. लि., पुणे यांचेकडुन दि.28/02/2006 नुसारझालेल्या 15 वर्षाचे करारनाम्यानुसार नॉन क्लोरोनेटेड बॅगा त्यांचेकडुनघेणेत याव्यात त्यानुसार त्यांना दि.29/02/2020 पासुन सहा महीने किंवानविन ई निविदा प्रक्रीया, अनुभवी संस्थेची कार्यवाही पुर्ण होवुन नविनप्लांट हा मोशी येथे उभारुन पुर्ण क्षमतेने चालु होईपर्यंत मुदतवाढ देणेतआलेली आहे. त्यानुसार कोविड सेंटर व वायसीएम रुग्णालयास आवश्यक नॉनक्लोरोनेटेड पिवळया बॅगा एकुण 44,200 नग एकुण र.रु.8,37,625/- (अक्षरी र.रू.आठ लाख सदोतीस हजार सहाशे पंचवीस फक्त) चा पुरवठाआदेश दिला असुन येणारे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३०६ | विषय क्रमांक – ८
दिनांक – १२/०८/२०२० | विभाग – ब क्षेत्रिय, पाणीपुरवठा
सुचक – मा.राजेंद्र लांडगे | अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/पापु/२/कावि/९५/२०२०, दि.२७/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे–

सन २०१८-१९ साठी स.नं.९६ रावेत गायरान, मामुर्डी उपविभागाअंतर्गत पाणीपुरवठा होणा-या वितरण व्यवस्थेचे परिचालन करणे व देखभाल दुरुस्ती करणे" या कामाचा आदेश मे.श्री.बापदेव महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्थामर्यादीत यांना दि.०१/०३/२०१९ रोजी देणेत आला आहे. सदर कामाची मुदत १२महिने म्हणजेच दि.२९/०२/२०२० पर्यंत होती. सदर मुदती नंतरच्या

परिचालन वदेखभाल दुरुस्तीच्या कामांच्या निविदा ई निविदा सुचना क्र.पाणीपुरवठा/मुख्यालय/ १२/०२/२०१९-२०, दि.३०/१२/२०१९ रोजी प्रसिद्ध करणेत आलेल्या होत्या. तथापि, परिचालन कामांच्या वेगळ्या निविदा काढणेची मागणी आल्याने सदर निविदा रद्द करणेत आल्या आहेत. त्यानंतर परिचालन कामासाठी निविदादर आल्याने प्रथमत: त्यासाठी प्रत्येक जलक्षेत्रनिहाय दरपृथ:करण करुनअंदाजपत्रक तयार करणे, देखभाल दुरुस्तीसाठी वेगळे अंदाजपत्रक तयार करणे, सदरकामांना तांत्रिक मान्यता घेणे व पुढील कार्यवाही करणेचे चालू असतांना यादरम्यान कोरोना व्हायरस प्रकोपामूळे पुढील निविदा कार्यवाही थांबल्यामूळेसदर कामास यापुर्वी मा.आयुक्त यांचे दि.२०/०४/२०२० चे मंजूर टिपणीनुसार ५ महिने म्हणजेच ३१ जुलै २०२० अखेर पर्यंत मुदतवाढ घेणेतआलेली आहे. मनपा अंदाजपत्रक-३, सन २०२०-२१ मध्ये पान क्र.८५०, अ.क्र.८ वरती अंदाजपत्रकीय र.रु.६०,००,०००/- एवढी असून सन २०२०-२१ चा मूळ अंदाजर.रू.३४,००,०००/- एवढा आहे. सदरची अंदाजपत्रकीय रक्कम तसेच सन २०२०-२१ चा मूळअंदाज उपरोक्त विषयांकीत कामासाठी पुरेसा आहे. त्यामूळे सदर कामास वाढ / घटकरावी लागणार नाही. परंतू सदर कामाची सुधारीत प्रशासकीय मान्यता र.रु.५९,९०,०००/- एवढी येत असल्याने सदर कामास वाढीव खर्च होणार आहे. सदरचावाढीव खर्च र.रु.१५,४१,७८४/- (सुधारीत प्रशासकीय मान्यता र.रु.५९,९०,०००/- वजा निविदा रकमेवरती निविदा दर वगळता र.रु.४४,४८,२१६/-)एवढा येणार आहे. त्या अनुषंगाने र.रु.१५,४१,७८४/-(अक्षरी र.रू.पंधरा लाख एक्केचाळीस हजार सातशे चौ-याऐंशी फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३०७ विषय क्रमांक – ९
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – ह क्षेत्रिय
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.अति. आयुक्त(३) तथा सह शहर अभियंता (वि/यां) यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/पापु/२/ कावि/९५/२०२०, दि.२७/०७/२०२०

मा.अति. आयुक्त(३) तथा सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत, भोसरी एम.आय.डी.सी.येथील लघुउद्योजक गाळे कोविड-१९ च्या आपत्ती व्यवस्थापनाकरिता (कोविड केअर सेंटरकरिता) वापरणेत येणार असल्याने त्याठिकाणी वीजपुरवठा करणे आवश्यक आहे. त्याकरिता इकडील पत्र क्र.हक्षेका/वि/कावि/ १४७/२०२० दि.२९.०६.२०२० अन्वये म.रा.वि.वि.कं.लि.यांना कळविले असता, त्यांचेकडील कोटेशन क्र.AEE/BSR/LS/PUBLICSERVICES/T/19-20/09 दि.23.07.2020 अन्वये कोटेशन प्राप्त झाले आहे. त्यामध्ये नवीन वीजमीटरच्या फर्म कोटेशनची र.रु.२५,९९३/- इतकी रक्कम कळविली आहे. सदरची रक्कम अदा केलेनंतर वीज जोडणी व नवीन वीजमीटर म.रा.वि.वि.कं.लि.यांचे कडून उपलब्ध होणार आहे. तरी सदर रक्कम म.रा.वि.वि.कंपनीस अदा करणे आवश्यक आहे. तरी, भोसरी

एम.आय.डी.सी.येथील लघुउद्योजक गाळे कोविड-१९ च्या आपत्ती व्यवस्थापना करिता (कोविड केअर सेंटर करिता) वीजपुरवठा करणेकरिता म.रा.वि.वि.कं.लि.यांना र.रु.२५,९९३/- (अक्षरी र.रु.पंचवीस हजार नउशे त्र्यान्नव फक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३०८ विषय क्रमांक – १०

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – वैद्यकिय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्तयांचेकडील पत्र क्र.वैद्य/३/कावि/५०५/२०२०, दि.२८/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्तयांनी शिफारस केले प्रमाणे–

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये कोरोनाविषाणूचे प्रादुर्भावामुळे कोवीड१९ या संसर्गजन्य आजाराच्या साथीमुळेउद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीचे अनुषंगाने महानगरपालिकेच्या यशवंतरावचव्हाण स्मृती रुग्णालयासह इतर सर्व रुग्णालये व दवाखान्यांमधूनडॉडी.वाय.पाटील मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल ऍ़न्ड रिसर्च सेंटर, पिंपरी येथेप्रस्तावात नमुद प्रमाणे होणा-या रुग्णांचे अनुषंगाने करारनामा करणे व रुग्णांचेउपचारास्तव महापालिकेने निश्चित केलेनुसार पुढील ३ महिन्यांचे कालावधीतप्रतिपुर्ती करुन द्यावयाच्या रकमेकरीता र.रु.५ कोटी अथवा होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३०९ विषय क्रमांक – ११

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – झो.नि.पु.,स्थापत्य

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/४३५/२०२०,दि.२७/०७/२०२०

विषय – सन २०१९-२० मधील व त्यापूर्वीच्या चालू असलेल्या विकास कामांची बिले अदा करणे.

सदरचा विषय मागे घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३१० विषय क्रमांक –१२

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – मध्य.साहित्य भांडार, वैद्य

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्तयांचेकडील पत्र क्र.मसाभां/५/कावि/४३६/२०२०,दि.२८/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

सध्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय हे कोविड १९ उपचाराकरीता समर्पितकरण्यात

आलेले आहे. त्यामुळे सदर रुग्णालयात कोरोना बाधित रुग्णांवर उपचारकरण्यात येत आहेत. तसेच रुग्णालयात कोरोना संशयित रुग्ण व बाधितरुग्णांची संख्या दिवसागणिक वाढत चाललेली आहे. त्यामुळे M/s.BVG India Ltd. यांना दिलेल्या आदेशाची मुदत माहे जुलै २०२० रोजी संपुष्टात येणारअसल्याने व सध्याची Covid-19ची परिस्थिती लक्षात घेता त्यांना माहे ऑगस्ट२०२० पासून किमान वेतन कायदयानुसार त्यांचे समवेत झालेल्या करारनाम्यासअधिन राहून प्रति महा र.रु.४२,४०,३८४/- प्रमाणे सहा महिन्याकरीता येणा-या र.रु.२,५४,४२,३०४/- (अक्षरी र.रू.दोन कोटी चोपन्न लाख बेचाळीस हजार तीनशे चार फक्त) चे खर्चास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर कामासाठी ऑगस्ट २०२० पासून ६ महिने कालावधीसाठी मान्यता देण्यात येत असून प्रशासनाने या कालावधीत सदर कामासाठी नवीन निविदा कार्यवाही त्वरेने करुन नव्याने एजन्सी निश्चित करावी. तसेच सदर कामासाठी पुन्हा मुदतवाढ द्यावी लागणार नाही याची खबरदारी घेणेचे अधीन मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३११ विषय क्रमांक – १३

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्तयांचेकडील पत्र क्र.पापु/८/कावि/४७२/२०२०,दि.२९/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्तयांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.4/4/2019-20 अन्वये सन 2019-20 करिता मोशी व च-होली परिक्षेत्रातील पाण्याच्या टाकीचे परिचालन करणे व किरकोळदुरुस्तीची कामे करणेकामी मे.जनसेवा स्वयं रोजगार सेवा सह संस्थामर्यादित नि.र.रू.1,00,21,723/- (अक्षरी र.रु.एक कोटी एकवीस हजारसातशे तेवीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,00,20,188/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर कामउपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.1,00,20,188/- पेक्षा 27% कमी म्हणजेचर.रु.73,14,737/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1535/- मटेरियल टेस्टींग चार्जेसर.रु.0/- = एकुण र.रु.73,16,272/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार वनिविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेचनिविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्यानिर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घटदरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहूनत्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३१२ विषय क्रमांक – १४
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्तयांचेकडील पत्र क्र.मभां/८/कावि/१०१०/२०२०,दि.२९/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोनाविषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती वकोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी सदरसाथीच्या रुग्णांवर वैद्यकीय उपचार करण्यासाठी Injection Remdesivir 100mgची तातडीने आवश्यकता आहे. त्याकरिता सदर इंजेक्शनची उत्पादित कंपनी M/S Mylan Laboratories Limited, Bangaloreयांचेकडून शासन निर्णयाच्याअनुषंगाने RC दरानुसार र.रु.3029+12%GST म्हणजेच र.रु.3392.48 प्रती व्हायल दराप्रमाणे 8100 Vials आवश्यकतेनुसार खरेदीकामी होणा-या एकुण र.रु.2,74,79,088/- (अक्षरी र.रू.दोन कोटी चौ-याहत्तर लाख एकोणऐंशी हजार अठ्याऐंशी फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता घ्यावी लागणार आहे. तथापि तातडीक बाब असलेने रूग्णालयाकडून भविष्यात सदर इंजेक्शनची मागणी प्राप्त झालेस आवश्यकतेनुसार व मंजूर दराने खरेदी करणेकामी येणा-या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचि ड प्रकरण 5(2)(2) नुसारकरारनामा न करता थेट पध्दतीने खरेदी करणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदरची खरेदी ही करारनामा करुन घेऊन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३१३ विषय क्रमांक – १५
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मभां/८/कावि/१०११/२०२०, दि.२९/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोनाविषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती वकोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी सदरसाथीच्या रुग्णांवर वैद्यकीय उपचार करण्यासाठी Injection Tocilizumab 400mg ची तातडीने आवश्यकता आहे. त्याकरिता सदर इंजेक्शनची उत्पादित कंपनी M/S Cipla Ltd, Mumbai या कंपनीचे अधिकृत विक्रेते M/S Laxmi Medicals, Ramwadi Pune-14यांचेकडून शासन निर्णयाच्या अनुषंगाने र.रु.30,870/- GST सहप्रती व्हायल या RC दराप्रमाणे 1080 Vials आवश्यकतेनुसार खरेदीकामी होणा-या एकुण र.रु.3,33,39,600/-

(अक्षरी र.रू.तीन कोटी तेहतीस लाख एकोणचाळीस हजार सहाशे फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता घ्यावी लागणार आहे. तथापि तातडीक बाब असलेने रूग्णालयाकडून भविष्यात सदर इंजेक्शनची मागणी झालेस आवश्यकतेनुसार व मंजूर दराने खरेदी करणेकामी येणा-या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचि ड प्रकरण 5(2)(2) नुसार करारनामा न करता थेट पध्दतीने खरेदी करणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदरची खरेदी ही करारनामा करुन घेऊन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३१४ विषय क्रमांक – १६

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा. राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा. भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मभां/८/कावि/१०१२/२०२०,दि.२९/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

भारतीय साथरोग नियंत्रण अनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम 63(6)व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी सदर साथीच्या रुग्णांवर वैद्यकीय उपचार करण्यासाठी Tablet Favipiravir 200mgची तातडीने आवश्यकता आहे. त्याकरिता सदर Tablet ची उत्पादित कंपनीM/S Glenmark Pharmaceuticals Limited, Mumbai या कंपनीचे अधिकृत विक्रेते M/S Konark Remedies,Mumbaiयांचेकडून शासन निर्णयाच्या अनुषंगाने र.रु.1999.20/- GSTसह प्रती Strip (34Tablets) या RC दराप्रमाणे 5400 Strip आवश्यकतेनुसार खरेदीकामी होणा-या एकुण र.रु.1,07,95,680/- चे खर्चास मा.स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता घ्यावी लागणार आहे. तथापि तातडीक बाब असलेने रूग्णालयाकडून भविष्यात सदर Tablet ची मागणी झालेस आवश्यकतेनुसार व मंजूर दराने खरेदी करणेकामी येणा-या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचि ड प्रकरण 5(2)(2) नुसार करारनामा न करता थेट पध्दतीने खरेदी करणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी सदर साथीच्या रुग्णांवर वैद्यकीय उपचार करण्यासाठी Tablet Favipiravir 200mg ची तातडीने आवश्यकता आहे. त्याकरिता सदर Tablet ची उत्पादित कंपनी M/S Glenmark Pharmaceuticals Limited, Mumbai या कंपनीचे अधिकृत विक्रेते M/S Konark Invacare Pvt.Ltd.,Thane यांचेकडून दिनांक ०४/०८/२०२० रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने र.रु.1559.24 GST सह प्रती Strip (34Tablets) या RC दराप्रमाणे 5400 Strip आवश्यकतेनुसार खरेदीकामी होणा-या एकुण र.रु.84,19,896/- (अक्षरी र.रू.चौ-याऐंशी लाख

एकोणीस हजार आठशे शहाण्णव फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता घ्यावी लागणार आहे. तथापि तातडीक बाब असलेने रूग्णालयाकडून भविष्यात सदर Tablet ची मागणी झालेस आवश्यकतेनुसार व मंजूर दराने करारनामा करुन घेऊन खरेदी करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३१५ विषय क्रमांक – १७

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – नगररचना व विकास

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.पौर्णिमा सोनवणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्तयांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/११/१३१/२०२०,दि.२९/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्तयांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातून पवना, मूळा व इंद्रायणी या नद्या वाहतात. पिंपरी चिंचवड मनपा मार्फत नदी काठ विकासप्रकल्पासाठीमे.एच.सी.पी.डिझाईन प्लॅनिंग मॅनेजमेन्ट प्रा.लि.अहमदाबादयांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेत आली असून त्यांचेमार्फत प्रकल्प अहवालबनवण्याचे काम चालू केले असून यामध्ये इन्द्रायणी नदीचा पिंपरी चिंचवडहद्दीतील नदीकाठ विकास करणेच्या कामाचाही समावेश आहे. सदर नदी सुधार प्रकल्पा अंतर्गत जमीनीची मोजणी करणेकामी उप अधिक्षक, भूमी अभिलेख, हवेली यांनीमौजे मोशी, मौजे चोविसावाडी, मौजे बो-हाडेवाडी, मौजे तळवडे, मौजे डुडूळगाव व मौजे चिखली, ता. हवेली येथील इंद्रायणी नदी लगत स.नं./सि.स.नं. च्या क्षेत्राचीमोजणी कामी साधी मोजणी फि र.रु.३,७३,५००/-, तातडी मोजणी फि र.रु.७,४७,०००/-अति तातडी मोजणी फि र.रु.२३,२२,०००/-, अति अति तातडी मोजणी फि र.रू.३३,७५,०००/- होत असलेबाबत कळविलेले आहे.तसेच दि.२३/०७/२०२० रोजीच्यापत्रान्वये पर्यावरण विभागाने मोजणी फी नगररचना विभागामार्फत अदा करण्याची कार्यवाही करणेस विनंती केली आहे. तरी उप अधिक्षक, भूमी अभिलेख, हवेली यांनी मौजे मोशी, मौजे चोविसावाडी, मौजे बो-हाडेवाडी, मौजे तळवडे, मौजे डुडूळगाव व मौजे चिखली, ता. हवेली येथील इन्द्रायणी नदी लगत स.नं./सि.स.नं.च्या क्षेत्राची मोजणीकामी साधी मोजणी फि र.रु.३,७३,५००/ - (अक्षरी र.रू.तीन लाख त्र्याहत्तर हजार पाचशे फक्त) उप अधिक्षक, भूमी अभिलेख, हवेली यांचे कार्यालयाकडे जमा करणेस येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३१६ विषय क्रमांक – १८

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – नगररचना व विकास

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्तयांचे कडील पत्र क्र.नरवि/कावि/११/१३२/२०२०, दि.२९/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्तयांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, नगररचना व विकास विभागामार्फत मंजूर विकास

योजनेतील आरक्षण व रस्त्याच्या जागा विकास हक्क प्रमाणपत्र/विकास हक्क/चटईक्षेत्र निर्देशांक चे बदल्यात ताब्यात घेण्यात येतात. संबधित भूसंपादन प्रक्रियेत जमीनधारक सहकार्य करत नसल्यास सदर जागा मा.जिल्हाधिकारी यांचे माध्यमातून नवीन भूसंपादन कायद्याच्या तरतुदीनुसार ताब्यात घेण्यात येतात. तसेच आरक्षणा खालील शासकीय जागा विहीत नमून्यातील प्रस्ताव सादर करून मा.जिल्हाधिकारी यांचेकडून ताब्यात घेण्यात येतात. शासनाकडील विशेष भूसंपादन अधिकारी कार्यालयाकडील अपुरा कर्मचारी वर्ग, शहरी विभागातील जमीनींच्या ताब्याच्या किचकट बाबी व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील वेगाने वाढणारे शहरीकरण या अनुषंगाने शहरातील रस्ते व आरक्षणे यांच्या जागा ताब्यात घेण्याची आवश्यकता लक्षात घेऊन शासनाच्या भूसंपादन घटक क्र.१ व २ कार्यालयाचे मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडील प्रस्ताव जलदगतीने होणेकामी भूसंपादन क्षेत्रातील अनुभव असलेला समन्वयक भूसंपादन अधिकारी श्री.शरद विनायक नाईक,निवृत्त उपजिल्हाधिकारी यांची निवड करणेत येऊन मा.स्थायी समिती ठराव क्र.५००९, दि.१२/०७/२०१९ रोजीच्या सभेच्या मान्यतेने दरमहा र.रू.३५०००/ या एकत्रित मानधनावर १ वर्ष कालावधीसाठी मंजूरी प्रदान करणेत येऊन आदेश क्र.नरवि/कावि/आ-२/९८८, दि.१७/०७/२०१९ अन्वये नेमणूक करणेत आली आहे. सदर आदेशात नमूद १ वर्षाचा कालावधी दि.१६/०७/२०२० रोजी संपुष्टात आलेला आहे. सदर करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी तीन वर्षापर्यंत अनुज्ञेय असल्याने संबधित समन्वयक भूसंपादन अधिकारी या पदाची नेमणूक पुढे सुरू ठेवणेकरीता त्यांचे आदेशाचे नुतनीकरण होणे आवश्यक आहे. सदर समन्वयक भूसंपादन अधिकारी या पदावर दरमहा र.रू.३५,०००/- एकत्रित मानधनावर पुढील १ वर्ष मुदतवाढीसाठी र.रू.४,२०,०००/- इतका खर्च येणार आहे. तरी पिंपरी चिंचवड मनपाच्या नगररचना विभागात समन्वयक भूसंपादन अधिकारी यापदावर निवृत्त उपजिल्हाधिकारी श्री.शरद विनायक नाईक यांची मा.आयुक्त यांचेकडील दि.१७/०७/२०१९ रोजीच्या आदेश क्र.नरवि/कावि/आ-२/९८८/२०२० अन्वये१ वर्षाचे कालावधीकरीता केलेल्या नियुक्तीचे नुतनीकरण करणेस व त्याकामी येणारा खर्च र.रू.४,२०,०००/- (अक्षरी र.रू.चार लाख वीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३१७ विषय क्रमांक – १९

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.विमुका/०४/कावि/२४०/२०२०, दि.२९/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र.02-01/2020-2021 अन्वये क क्षेत्रीय कार्यालयांतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बालनगरी इमारतीमध्ये कोरोना (COVID-19) केअर सेंटर उभारणे या कामाकरीता विद्युत विषयक कामे करणेकामी मे.रुपलक्ष्मी इलेक्ट्रीकल्स निविदा र.रु.99,97,620/- (अक्षरी र.रु.नव्याण्णव लाख सत्त्याण्णव हजार सहाशे वीस फक्त) पेक्षा -

18.00% कमी या ठेकेदाराकडून काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३१८ विषय क्रमांक – २०

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – ह क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (२) यांचेकडील पत्र क्र.स्था/हक्षे/कावि/२३९/२०२०, दि.२३/०७/२०२०

मा.अति.आयुक्त (२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिं.चिं.मनपाच्या ह क्षेत्रीय स्थापत्य विभागांतर्गत कार्यक्षेत्रातप्रभाग क्र.३० येथे कोरोना (कोव्हिड–१९) विषाणूमुळे उद्भवलेल्या रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी कोरोना बाधित क्षेत्र प्रतिबंधीत करणेकामी मंडप व्यवस्था करणे व इतर अनुषंगिक आवश्यक कामे करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये कोरोना कोव्हिड – १९ चे रूग्ण संख्या झपाट्याने वाढत आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्र.३० हद्दीत कासारवाडी, संत तुकारामनगर, नाणेकर चाळ, वैशालीनगर इत्यादीचा भाग येत आहे. सदर भागात प्रशासनाकडून ज्या भागात रूग्ण सापडत आहेत त्या भागाचे सीमा प्रतिबंधीत करणे, पोलीसांना पहारा देणेसाठी व बंदोबस्तासाठी मंडप टाकणे, प्रतिबंधीत क्षेत्र फ्लेक्स लावणे, त्या भागातील दुकानांना सम-विषम तारखेचे बोर्ड तयार करणे इत्यादी कामे दररोज करावी लागत आहेत. त्या करिता स्थापत्य विभागामार्फत ठेकेदार यांची नेमणूक करणेकरीता मा.अति.आयुक्त-२ यांच्या दि.२३/०६/२०२० च्या मंजुर प्रस्तावानुसार व सुचने नुसार दि.०३/०७/२०२० ते दि.१०/०७/२०२० दरम्यान र.रू.२,९९,०००/- कोटेशन मागविण्यात आले आहेत. त्यानुसार मे.लालदिप कन्स्ट्रक्शन यांचेकडून १०% कमी इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. त्यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारची कामे केलेली आहेत व सध्या काही कामे प्रगतीपथावर आहेत. त्यांनी मनपाला आत्तापर्यंत वेळोवेळी आवश्यक मागणीनुसार सेवा दिलेली आहे. सबब, त्याकामी मे.लालदिप कन्स्ट्रक्शन यांची नेमणुक करुन त्याकरीता प्राप्त झालेल्या दरानुसार सदर कामाकरीता एकूण कामाच्या म्हणजे र.रू.२,९९,०००/- पेक्षा १०% कमी या दराने म्हणजेच र.रु.२,६९,१००/- (अक्षरी र.रु.दोन लाख एकोणसत्तर हजार शंभर फक्त) पर्यंत काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदाअटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करून बील अदायगी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३१९ विषय क्रमांक – २१

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – ह क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (२) यांचेकडील पत्र क्र.स्था/हक्षे/कावि/२३७/२०२०, दि.२३/०७/२०२०

मा.अति.आयुक्त (२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिं.चिं.मनपाच्या ह क्षेत्रीय स्थापत्य विभागांतर्गत कार्यक्षेत्रात प्रभाग क्र.२० येथे कोरोना (कोव्हिड-१९) विषाणूमुळे उद्भवलेल्या रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी कोरोना बाधित क्षेत्र प्रतिबंधीत करणेकामी मंडप व्यवस्था करणे व इतर अनुषंगिक आवश्यक कामे करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये कोरोना कोव्हिड – १९ चे रूग्ण संख्या झपाट्याने वाढत आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्र.२० हद्दीत कासारवाडी, संत तुकारामनगर, नाणेकर चाळ, वैशालीनगर इत्यादीचा भाग येत आहे. सदर भागात प्रशासनाकडून ज्या भागात रूग्ण सापडत आहेत त्याभागाचे सीमा प्रतिबंधीत करणे, पोलीसांना पहारा देणेसाठी व बंदोबस्तासाठी मंडप टाकणे, प्रतिबंधीत क्षेत्र फ्लेक्स लावणे, त्या भागातील दुकानांना सम-विषम तारखेचे बोर्ड तयार करणे इत्यादी कामे दररोज करावी लागत आहेत. त्याकरिता स्थापत्य विभागामार्फत ठेकेदार यांची नेमणूक करणेकरीता मा.अति.आयुक्त-२ यांच्या दि.२३/०६/२०२० च्या मंजुर प्रस्तावानुसार व सुचनेनुसार दि.०३/०७/२०२० ते दि.१०/०७/२०२० दरम्यान र.रू.२,९९,०००/- चे कोटेशन मागविण्यात आले आहेत. त्यानुसार मे.लालदिप कन्स्ट्रक्शन यांचेकडून १०% कमी इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. त्यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारची कामे केलेली आहेत व सध्या काही कामे प्रगतीपथावर आहेत. त्यांनी मनपाला आत्तापर्यंत वेळोवेळी आवश्यक मागणीनुसार सेवा दिलेली आहे. सबब, त्याकामी मे.लालदिप कन्स्ट्रक्शन यांची नेमणुक करुन त्याकरीता प्राप्त झालेल्या दरानुसार सदर कामाकरीता एकूण कामाच्या म्हणजे र.रू.२,९९,०००/- पेक्षा १०% कमी या दराने म्हणजेच र.रु.२,६९,१००/- (अक्षरी र.रु.दोन लाख एकोणसत्तर हजार शंभर फक्त) पर्यंत काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करून बील अदायगी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३२० विषय क्रमांक – २२

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – ह क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.पौर्णिमा सोनवणे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (२) यांचेकडील पत्र क्र.स्था/हक्षे/कावि/२३८/२०२०, दि.२३/०७/२०२०

मा.अति.आयुक्त (२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिं.चिं.मनपाच्या ह क्षेत्रीय स्थापत्य विभागांतर्गत कार्यक्षेत्रात वाय.सी.एम.हॉस्पिटल येथे कोरोना (कोव्हिड-१९) विषाणूमुळे उद्भवलेल्या रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी कोरोना बाधितक्षेत्र प्रतिबंधीत करणेकामी मंडप व्यवस्था करणे व इतर अनुषंगिक कामे करणे आवश्यक आहे. पिंपरी

चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये कोरोना कोव्हिड – १९ चे रूग्ण संख्या झपाट्याने वाढत आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्र.२० हद्दीत संत तुकारामनगर कै.यशवंतराव चव्हाण रूग्णालयाचा भाग येत आहे. सदर भागात प्रशासनाकडून ओ.पी.डी., नातेवाईक, औषध वाटप यासाठी मंडपाची आवश्यकता आहे. तसेच, पोलीसांना पहारा देणेसाठी मंडप टाकणे, तसेच रूग्णालयातील आतील भागात आवश्यकतेनुसार बंदिस्त करणेसाठी पडदे लावणे इत्यादी कामे करावी लागत आहेत. त्याकरिता स्थापत्य विभागामार्फत ठेकेदार यांची नेमणूक करणेकरीता मा.अति.आयुक्त-२ यांच्या दि.२३/०६/२०२० च्या मंजुर प्रस्तावा नुसार व सुचने नुसार दि.०३/०७/२०२० ते दि.१०/०७/२०२० दरम्यान र.रू.२,९९,०००/- कोटेशन मागविण्यात आले आहेत. त्यानुसार मे.लालदिप कन्स्ट्रक्शन यांचेकडून १०% कमी इतका लघुत्तम दरप्राप्त झालेला आहे. त्यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारची कामे केलेली आहेत व सध्या काही कामे प्रगतीपथावर आहेत. त्यांनी मनपाला आत्तापर्यंत वेळोवेळी आवश्यक मागणीनुसार सेवा दिलेली आहे. सबब, त्याकामी मे.लालदिप कन्स्ट्रक्शन यांची नेमणुक करुन त्याकरीता प्राप्त झालेल्या दरानुसार सदर कामाकरीता एकूण कामाच्या म्हणजे र.रू.२,९९,०००/- पेक्षा १०% कमी या दराने म्हणजेच र.रु.२,६९,१००/- (अक्षरी र.रु.दोन लाख एकोणसत्तर हजार शंभर फक्त) पर्यंत काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करून बील अदायगी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३२१ विषय क्रमांक – २३
दिनांक – १२/०८/२०२० विभाग – ग क्षेत्रिय, लेखा
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्तयांचेकडील पत्र क्र.गक्षेका/नि-०३/११२/२०२०, दि.२१/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सन २०१९-२० मधील व त्यापूर्वीच्या चालू असलेल्या विकास कामांची बीले माहे मार्च २०२० मध्ये जगभरात कोरोना विषाणूचा प्रसार झाल्याने लॉक डाऊन जाहीर करण्यात आले व संचारबंदी लागू करण्यात आली. माहे मार्च २०२० मध्ये ग क्षेत्रीय कार्यालयातील विद्युत विभागाचेसन २०१९-२० चे अंदाजपत्रकातील १४ विकास कामांची बिले प्रलंबित आहेत. परंतू आपत्कालीन परिस्थितीमुळे सदरची बिले अदा करता आलेली नाहीत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागांतर्गत सन २०१९-२० मधील व त्यापुर्वीच्या चालू असलेल्या विकास कामांची प्रस्तावा सोबतची प्रलंबित १४ बिले संबधितास अदा करणे आवश्यकआहे.

| अ.क्र | क्षेत्रीय कार्यालय | कामांची संख्या | अदा करावयाची र. रु |
|---|---|---|---|
| १ | विद्युत विभाग, ग क्षेत्रीय कार्यालय | १४ | ४१,७४,८९७/- |

तरी उपरोक्त प्रमाणे प्रस्तावात नमूद केलेनुसार माहे मार्च २०२० मध्ये अदा न केलेली बिले अदा करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०२ नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३२२ | विषय क्रमांक – २४
दिनांक – १२/०८/२०२० | विभाग – वैद्यकिय मुख्यालय
सुचक – मा.राजेंद्र लांडगे | अनुमोदक – मा.शितल शिंदे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्तयांचेकडील पत्र क्र.वैद्य/१/कावि/१०१९/२०२०, दि.२७/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय अत्यावश्यक सेवेमध्ये अडथळा निर्माण होऊ नये म्हणून तसेच कोवीड १९ संसर्गाच्या आपत्कालीन परिस्थितीचे पार्श्वभूमीवर सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या मानधनावरील तज्ञवैद्यकिय अधिकारी, वैद्यकिय अधिकारी व इतर पॅरामेडिकल कर्मचा-यांना सध्या दिल्या जात असलेल्या मानधनावर त्यांची दि.२८/०७/२०२० रोजी ०१ दिवसांचीसेवा पुर्णत: खंडीत करुन दि.२९/०७/२०२० पासुन ते दि.२८/१०/२०२० अखेर ०३ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व त्यांना द्यावयाचे मानधनाचे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३२३ | विषय क्रमांक – २५
दिनांक – १२/०८/२०२० | विभाग – पाणीपुरवठा मुख्यालय
सुचक – मा.सुवर्णा बुर्डे | अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.पापु/८/कावि/४७१/२०२०, दि.२१/०७/२०२०

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.४/०९/२०१९-२० अन्वये सन २०१९-२० करीता प्रभाग क्र.३० अंतर्गत कासारवाडी पाण्याच्या टाकीवरील पाणीपुरवठाक्षेत्रात तसेच फुगेवाडी या परिसरात परिचालन करणे व देखभाल दुरुस्तीची कामेकरणेकामी मे.भारतीय महिला स्वंय रोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, नि.र.रू.३१,२६,१९०/- (अक्षरी र.रु.एकतीस लाख सव्वीस हजार एकशे नव्वद फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रू.३१,२५,५६०/- वर निविदा दर मागविणेत आलेआहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रू.३१,२५,५६०/-पेक्षा २९.०९% कमी म्हणजेच र.रू.२२,१६,३३५/- + रॉयल्टी चार्जेस र.रू.६३०/-मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रू.०/- = एकूण र.रू.२२,१६,९६५/- पर्यंत काम करूनघेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवाकर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढकलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राटकालावधीमध्ये

झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारकराहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यतादेणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३२४ विषय क्रमांक – २६

दिनांक – १२/०८/२०२० विभाग – सुरक्षा

सुचक – मा.पौर्णिमा सोनवणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (२) यांचेकडील पत्र क्र.सुवि/३/कावि/३५२/२०२०, दि.२९/०७/२०२०

मा.अति.आयुक्त (२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कै.वाय.सी.एम.रुग्णालय येथे कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) रुग्णांसाठी राखीव आहे व शहरात कोरोना बाधीत रुग्णांची संख्या दिवसें-दिवस वाढत आहे. तसेच दि.२५/०७/२०२० ते दि.२७/०७/२०२० या कालावधीत रुग्णाचे नातेवाईकांनी डॉक्टर, स्टाफनर्स, व इतर कर्मचारी यांना शिवीगाळ व दमदाटी करुण तणावाचे वातावरण निर्माण केल्याने वैद्यकीय कर्मचा-यांचे मनोबल कमी होत असुन वैद्यकीय सेवा देण्यास अडचणी निर्माण होत आहे. दिनांक २५/०७/२०२० ते दि.२७/०७/२०२० या दोन दिवसांमध्ये घडलेल्या प्रकारामुळे कै.वाय.सी.एम.रुग्णालय येथील वैद्यकीय कर्मचा-यांनी दिनांक २७/०७/२०२० रोजी आंदोलन केले होते. सद्यस्थितीमध्ये पिंपरी चिंचवड शहरामध्ये कोरोना विषाणूची परिस्थिती पाहता पुढील दोन महिन्यासांठी कोरोना विषाणूने बाधित पेशंटची वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पुढील दोन महिन्यांसाठी वैद्यकीय कर्मचा-यांच्या सुरक्षेकामी दिनांक २७/०७/२०२० रोजी मा.आयुक्त सो. व अति आयुक्त (२) व (३) यांच्या दरम्यान झालेल्या चर्चेनुसार कै.वाय.सी.एम.रुग्णालय येथे तातडीची बाब म्हणून तापुरत्या स्वरुपात बाऊन्सर घेणेकामी आदेशित केलेले आहे. त्यानुसार मा.अति.आयुक्त (२) यांना PROTECTION POWER BOUNCERS या संस्थेने दिनांक २८/०७/२०२० अन्वये प्रति बाऊसर प्रतिमाह र.रु.२५,०००/- मानधनाचे कोटेशन सादर केलेले आहे. त्यानुसार मा.अति.आयुक्त (२) यांनी सुरक्षा अधिकारी यांना सदर संस्थेकडून एका पाळीत १ महिला बाऊसर व ३ पुरुष बाऊसर असे तिन्ही पाळीत एकूण बारा बाऊन्सर पुढील दोन महिन्यांसाठी घेणेकामी आदेशित केले आहे. सदरची बाब तातडीची असून प्रायोगिक तत्त्वावर निविदा प्रणाली न राबवता मा.आयुक्त सो. यांची प्रशासकीय मान्यता घेऊन व मा.स्थायी समितीची येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर संस्थेने सादर केलेल्या कोटेशननुसार प्रति बाऊसर प्रति माह र.रु.२५,०००/- एकत्रित मानधनानुसार ४ महिला बाऊसर व ८ पुरुष बाऊसर यांचा दोन महिन्यासाठी र.रु.६,००,०००/- (अक्षरी र.रु.सहा लाख फक्त) व त्यावर येणारा जी.एस.टी.चा खर्च अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक - नस/३/कावि/७७०/२०२०
दिनांक – १३/०८/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**प्रत** - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी